Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept 2012
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# *कलियुगातील ध्रुवतारा : एक शोध*

*जयश्री संजय सातोकर*

प्रगती महिला कला महाविद्यालय,
भंडारा

## *प्रस्तावना :—*

भंडारा जिल्हयातील लाखनी येथील समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पोहरकर हे 'गोंविंदसुत या टोपणनावाने काव्यलेखन करतात. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव. त्यांच्या वरील श्रध्देपोटीच कवी केशवसुतांच्या परंपरेतील कवी गोविंदसुत हे नाव त्यांनी धारण केले. त्यांच्या कवितेने गाठलेल्या तत्वचिंतनाच्या विविधांगी पातळीमुळे त्यांच्या कवितांचे आशयविश्व हा खरोखरीच संशोधनाचा विषय ठरलेला आहे.

''देव आंघोळीला गेले'' आणि ''कलियुगातील ध्रुवतारा'' हे त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. प्रस्तुत ठिकाणी 'कलियुगातील ध्रुवतारा' या काव्यसंग्रहातील 'कलियुगातील ध्रुवतारा' या कवितेचा शोध घेण्याचे प्रयोजन आहे.

प्रस्तुत कवितेत असलेली रूपकात्मकता उलगडने, प्रतिमांचा अर्थ स्पष्ट करणे व सदर कवितेचा आशय उलगडून दाखविण्याचा हा प्रयत्न आहे. मुळातच शिर्षकातच दोन प्रतिमा आहेत. एक 'कलियुग' व दुसरी 'ध्रुवतारा'. 'कलियुग' या संकल्पनेने सूचित होणारा कालखंड हा एका विशिष्ट मानवी वृत्तीचा कालखंड असून या काळाची जीवनमूल्ये ही बदलत जाणारी आहेत. म्हणून कलियुग हे एका अर्थी कलहाचे युग, स्वार्थांधतेचे युग, संघर्षाचे—अनाचाराचे युग या अर्थी प्रतित होते. महाभारत काळात धर्मराजाच्या राज्यसथापनेनंतर धर्मराजासमोर एक मजेशीर भांडण न्यायनिवाडयासाठी आले होते. ते भांडण लक्षात घेतले की कलियुगातील वृत्ती—प्रवृत्तीची सूचकता लक्षात येते. ते भांडण असे, एका नागरिकाने आपल्या मालकीच्या जमिनीचा तुकडा दुसऱ्या एका नागरिकाला विकला. तो शेतीचा तुकडा शेतीसाठी नांगरतांना विकत घेणऱ्याला एक सुवर्ण मुद्रांचा हंडा त्या जमिनीत पुरलेला सापडला तो त्याने मूळ मालकाकडे सुपूर्द केला. ''हा तुमच्या मी विकत घेतलेल्या जमिनीत सुवर्णमुद्रांचा हंडा सापडलेला आहे. तो तुमचा तुम्हाला मी परत करीत आहे''.

मूळ मालकाने तो हंडा परत घेण्यास नकार दिला व परत निरोप पाठविला की, ''मी ती जमीन तुम्हाला विकली आहे त्यामुळे त्या जमिनीत तुम्हाला सापडलेला सुवर्णमुद्रांचा हंडा तुमचाचा आहे.'' त्या दोघांमधील हे भांडण धर्मराजासमोर आले. त्याला दोघांनिही मांडलेले म्हणणे पटत होते. त्याने श्रीकृष्णास विचारले, मी हे भांडण सोडवू कसे ?श्रीकृष्ण म्हणाला; ''अजून काही दिवस थांब कलियुग येते आहे. तुझ्या राज्यप्राप्तीला छत्तीस वर्ष पूर्ण होत आहेत. ती पूर्ण झाली की पुन्हा या दोघा भांडण करणाऱ्यांना बोलाव आणि त्यांचे म्हणणे ऐक''.

त्याप्रमाणे धर्मराजाने केले व त्या भांडण करणाऱ्यांना आपले म्हणणे मांडण्यास सांगितले. तेव्हा—मूळ मालक म्हणाला, ''मी त्या नागरिकाला तो जमिनीचा तुकडाच केवळ विकला आहे. त्या जमिनितला सुवर्णमुद्रांचा हंडा विकला नाही तो माझा मला परत पाहिजे.'' विकत घेणारा म्हणाला ''सुवर्णमुद्रांचा हंडा परत मिळणार नाही जमिन मला विकलित म्हणजे जमिनीतली प्रत्येक वस्तू माझाी झाली तेव्हा हा सुवर्णमुद्रांचा हंडाही माझा झाला''

धर्म कृष्णाला म्हणाला, ''दोघांचेही म्हणणे आता बदलले, पूर्वी दोघेही त्यागी वृत्तीचे होते आणि प्रामाणिक होते. दोघांनाही परवस्तूचा लोभ नव्हता. दोघांचेही म्हणणे पटत होते. म्हणून भांडण सोडविता येणे अवघड होते.''

श्रीकृष्ण म्हणाला आज तर त्यापेक्षाही अवघड आहे. कारण आज ते आत्मकेंद्रित झाले आहेत. त्या सुवर्णमुद्राचा लोभ दोघांनाही आहे. आज कलियुगाचा प्रभाव दिसू लागला आहे. आजही तू हे भांडण सोडवू शकत नाहीस.

धर्मराज म्हणाला,'' समजा !हा सुवर्णमुद्रांचा हंडा मी राजा म्हणून माझ्या ताब्यात घेतला आणि लोकापयोगी कार्यासाठी त्या धनाचा वापर करतो असे म्हटले तर ?''

श्रीकृष्ण म्हणाला, ''तर ते दोघेही तुझ्यावर तुटून पडतील स्वार्थाचा अप्रामाणिकपणाचा, अपहाराचा आरोप करतील सर्वाधिकारी

**Please cite this Article as :** *जयश्री संजय सातोकर, कलियुगातील ध्रुवतारा : एक शोध : एक समीक्षा* **: Golden Research Thoughts (Sept ; 2012)**

जुल्मी राजा म्हणतील. हेच तू पूर्वी केले असतेस तर तुला हे दोघे न्यायी, लोकाभिमुख प्रामाणिक आणि बुध्दिमान म्हणाले असते. हाच तुला कलियुग सुरू झाल्याचा परिणाम दिसेल. ''तुझे ते तुझेच व माझे ते आपणासर्वांचेच.'' ही वृत्ती जावून ''माझे ते माझेच व तुझे तेही माझेच'' ही वृत्ती निर्माण झालेली दिसेल. धर्मराज्य संपल्याची ही लक्षणे तुला राज्यकर्त्यापासून ते लोकांपर्यत सर्वातच दिसतील त्याची ही फक्त चाहूल आहे. कलियुग सुरू होण्यापूवी ती चाहूल दुर्याधनाने आपल्या वृत्तीने तुम्हाला दिली होती. म्हणून तर अंतिम धर्म न्याय, सत्य, रक्षणकरून खरे अहिंसा—पालन करण्यासाठी भारतीय युध्दातील हिंसा तुमच्यावर लादल्या गेली अटळ केली गेली. ही चाहूल कलियुगाच्या आगामी भीशणतेची होती. म्हणून श्रीकृष्णाने गीतातत्त्वज्ञान प्रत्यक्ष प्रकटपणे सांगून चांगुलपणाचा अंश तत्त्वज्ञान संसर्गाने का होईना निर्माण व्हावा आणि कलियुगाची भयानकता अंशतः तरी कमी व्हावी म्हणून प्रयत्न केला.'[1]

कलियुगासंबधीचा श्रीकृष्ण व धर्मराज यांच्यातील हा संवाद लक्षात घेवूनच प्रस्तुत कविता समजून घेणे सोपे जाते. कारण कलियुगातील मूल्य-ऱ्हासाची अपरिहार्यता मांडणे हा प्रस्तुत कवितेचा मुख्य प्रतिपादय विशय आहे. यात 'ध्रुवतारा ' ही प्रतिमा स्वाभिमानी ध्येयनिष्ठ ,करारी वृत्तीच्या मानसाचे प्रतिक म्हणून येते. परंतु या युगात अशा माणसांना स्वतःचे 'स्वः' त्व रक्षण कितीही महत्वाचे आणि मूल्यनिष्ठ वाटत असेल तरीही युगप्रभावापासून प्रयन्त करूनही ते मुक्त राहू शकत नाही त्यांच्याही विचारनिश्ठेची, मूल्यनिष्ठेची, नैतिकतेची वाताहत ही या युगाची जणू वैशिष्टेच आहेत. हे कवीने रूपकात्मकतेने सूचित केले आहे. अखेर मोठयामोठयांचे पाय मातीचेच असतात हे कलियुगाचेच वैशिष्टये आहे. हे कवीने दाखवून दिले आहे.

***कवितेचा सुरूवातीलाच —***

***सकलयुगातील अढळपदाने***
***मिरवित होता तो ध्रुवतारा***

हे धृपद येते. या पहिल्याच कडव्यात कलियुगाचे वैशिष्टय सूचित होते.

***कलियुगातील वादळवारे***
***विचलीत करिती अढळपदाला***

जणू या काळात धर्मराज जन्माला येतच नाहीत आणि आला तरी तो टिकत नाही सारे जग जणू भ्रष्टतेने व्यापलेले असते. 'भ्रष्टता' हा या युगाचा अपरिहार्य घटक आहे. तरीसुदधा स्वतः मूल्यहीन जीवन जगून मूळात सज्जनवृत्तीच्या असलेल्या माणसांकडून आदर्श व्यहाराची मात्र अपेक्षा करतात हे सूचित करण्यासाठी कवी म्हणतो

***ध्रुवताऱ्या तू नको ढळु रे`***
***भ्रष्ट जगाची आशा तूजवर***

एकेक काव्यपंक्ती अशी अर्थसंपृक्त आहे. आपल्या दृढनिश्चयाने स्वतःचे वेगळे तेजस्वी स्थान निर्माण केलेला ध्रुवतारा जणू कलियुगात पाहावला जात नाही. म्हणूनच

***सकल ग्रहांचे चक्रीवादळ***
***ध्रुवताऱ्याला पाहा घेरती***

असे सहजपणे लिहून जातात. मूल्य ऱ्हासाच्या वावटळीत सापडलेला हा ध्रुवतारा स्वतःच्या पतनाने अस्वस्थ होतो. व त्यांच्या मनात आक्रंदन सुरू होते हे आक्रंदनही शेवटी भ्रष्ट वातावरणाच्या वावटळीत निरर्थक ठरते. तो सुध्दा एक मनुष्य जीवच असतो. जीवाचे गुणदोष त्यालाही चिकटलेले असतात. त्याने स्वतःला कितिही सांभाळतो म्हटले तरी सांभाळता येत नाही अशी कलियुगातील ध्रुवताऱ्याची अवस्था होते.

***मग हा ध्रुवतारा***
***नका खेचू रे तुमच्या सोबत***
***आक्रंदे तो ध्रुव खरोखर***

अशा स्थितीत येतो. पण हे आक्रंदनही अखेर या शक्तिमान वावटळीत निरर्थक ठरते व —

***पक्व धृवाला कळले नाही***
***वावटळीत तो गेला दूरवर***

अशी त्याची स्थिती होते. इथे धृवाला 'पक्व' हे लावलेले विशेषण त्याची ज्ञानात्मक परिपक्वता दर्शविते तर वावटळीत त्याचे दूरवर उडून जाणे ही त्याची युगानुकूल अपरिहार्यता सिध्द करते. परंतु सर्वच काळात कितिही मूल्य ऱ्हास झाला तरीही ही मूल्ये जपल्या जावीत अशी आकाक्षांही समाजमनात असते. पण ही आकांक्षा मात्र सैल असते. तिथे स्वतःला वगळून इतरांकडून अपेक्षा मात्र तेवढी असते आणि या अपेक्षेच्या पार्श्वभूमिवरच कोणितरी प्रामाणिक आकांक्षा ठेवणारा एखादा मूल्यवान माणूसही असतो. पण या मूल्यवान माणसाचे मूल्यही केव्हातरी कलियुगाच्या वावटळीत अशीच कोसळणारे असते याची त्याला जाणिव नसते. तो थोडासा काळाच्या विपरित काही घेवून जगण्याचा प्रयत्न करतो हे सांगण्यासाठीच

***रिक्त तयाची जागा बधुनी***
***तिथे विसावे नवाच् ऋशीवर ।।***

हे वास्तवदर्शन मांडतो. शेवटी स्वतःच्या पतनाच्या दुःखाने अस्वस्थ झालेला ध्रुवतारा जे मला जमले नाही ते तुला जमेल असे म्हणतो. पण लगेच माझीच ही अवस्था झाली तर हा तरी तिथे टिकेल की नाही? असा प्रश्न त्याच्या मनात निर्माण होतो. त्याची ही मानसिक स्थिती ध्रुवताऱ्याचा माध्यमातून मांडतांना कवी म्हणतो,

***ध्रुवतारा मग वदे तयाला***
***तूच जगाची आशा ऋशीवर***
***शंकित होऊनी पुन्हा बोलला***
***असशील का नीत तिथे खरोखरी.***

ध्रुवताऱ्याचा या शंकित प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर तो ऋशी दृढनिश्चयाने उत्तर देतो पण हे उत्तर ध्रुवताऱ्याला मात्र अस्वस्थ करणारे आहे आश्वासूनी तो ऋशी बोलला, ''तुझ्या तपाला स्मरेन मी तर'' नव्या ऋशीच्या या आदरभावाने मूळातच वृत्तीचा प्रामाणिकपणा असल्याने ध्रुवतारा आत्मनिशेधाचे उद्‌गार काढतो. कलियुगात झालेला त्याचा तेजोभंग आणि तपोभंग त्याला अस्वस्थ करतो. ही अवस्था चित्रित करतांना कवी म्हणतो,
धिक्कारूनी ध्रुव स्वतःस वदला
कसला मी हो तपोबली तर !
वावटळीतील पाचोळा मी
कुठले तप अन कुठला जप

एका कठोर आत्मपरीक्षणाला ध्रुवतारा समोर जातो. कलियुगात जगायचे तर कलियुगातील वास्तवाला स्वीकारूनच पुढे जावे लागेल अशी त्याच्या पतित मनाची अवस्था झाली आहे. कलियुगातील भयान वास्तवाचे त्याला दर्शन झाले आहे. या दर्शनानंतर कवीला लोकजीवनाच्या धर्महीन विनाशकारी वाटचालीचे दृश्य स्पश्टपणे दिसू लागते व –

***कलियुगातील त्यागतपाला,***
***वदते जग रे` मूर्ख खरोखर***

असे ध्रुवाचे विधान येते. दृढनिश्चयी ध्रुवताऱ्याने असे बोलावे म्हणजे काय? ही तर सर्वस्व संपण्याची भयसूचक घंटा आहे. आणि कलियुगाची ती अपरिहार्यताही आहे. इथे माणसांचे मोठेपण टिकतच नाही. सूर्य ही अंधराचिच किरणे पृथ्वीवर ओतीत असतो व कुणीतरि विनाश होवू घतलेल्या या समाजव्यवस्थेला तोलण्याचा प्रयत्न करतोच करतो पण विनाश मात्र अटळ असला तरी हे सूचित करण्यासाठी कवी म्हणतो

***कलियुगातील त्यागपदाला***
***वदते जग रे` मूर्ख खरोखर***

या ध्रुवताऱ्याचा विधानाच्या पार्श्वभूमीवर म्हणतो,

***क्षणात एका विपरित घडले***
***महावादळी वावटळीने आकाशातील तारे ढळले***
***ध्रुव बाळाची जागा कुठली***
***पुन्हा कुणा ना कधीही दिसली***
***तेव्हा पासून सूर्य तमोमय***
***प्रकाश किरणे ओतीत असतो***
***गंजून गेल्या लोहाला मग***
***रेडाक्साईड कुणी पोततो.***

कवितेच्या या आशयाच्या अनुशंगानेच कवितेच्या भाषा शैलीचाही विचाार, अग्निसंप्रदायी प्रकाशपूजक कवी कुसुमाग्रजांच्या भाषेशी तुलना करण्याजोगा वाटतो. 'आगगाडी आणि जमीन' मधील 'नको गं नको गं आक्रंदे जमीन' हया ओळीशी 'ध्रुवताऱ्या तू नको ढळू रे, भ्रष्ट जगाची आशा तुजवर' या काव्यपक्ती तुलनीय वाटतात, ढळणे, ढाळणे यासारखे शब्दप्रयोग कुसुमाग्रजांचा पठडीतले वाटतात. भाषेला एक प्रवाहीपणाचे परिमाण प्राप्त होते. 'ध्रुवबाळाची जागा कुठली, पुन्हा कुणा ना कधीही दिसली' हया सारख्या ओळी रसिकाला अंतःर्मूख करून विचार करायला प्रवृत्त करतात. तमोमय प्रकाशकिरणे ओतण्याची कल्पनाही एका विपर्यस्त सत्याचे मनोहारी दर्शन घडविते तर –

***गंजून गेल्या लोहाला मग***
***रेडॉक्साईड कुणी पोतती***

यासारख्या ओळी मर्ढेकऱ्यांचा प्रतिमासृश्टीची आणि शैलीची जाणिव करून देतात. एकंदरीतच ही कविता कलियुगातील मानवी जीवनातील अपरिहार्यता चित्रित करणारी कविता म्हणून वास्तवदर्शी, लक्षणीय कविता होय.

***संदर्भ –***

1.संदर्भ संपूर्णमहाभारत खंड 9 संपादकः प्रा. भलबाकेळेकर वरदाबुक्स पुणे, नवी आवृत्ती 15 मार्च 1986
2. रसयात्रा – कुसुमाग्रज, संपादक : बोरकर वैद्य कॉन्टिमेन्टल प्रकाशन, फनार्मुद्रणे : 1989 – 2001
3.कलियुगातील ध्रुवतारा – गोंविंदसुत प्रमथावृत्ती मकरसक्रांत 14 जानेवारी 2010 साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी, नागपूर.